आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१ नोव्हेंबर २०२४ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- यंदाच्या विधानसभा निवडणुकीत राज्यात ९ कोटी ७० लाखांहून अधिक मतदार, शंभरी पार केलेल्या मतदारांची संख्या ४७ हजाराच्या वर

- रेल्वे तिकीट आरक्षणाचे नवीन नियम आजपासून लागू, दिवाळी छठ पूजेनिमित्त विशेष गाड्यांची सोय

- आज लक्ष्मीपूजन, शेअर बाजारात मुहूर्ताच्या सौद्यांमध्ये तेजी

**आणि**

- भारत - न्यूझीलंडमधल्या तिसऱ्या कसोटीत पहिल्याच दिवशी १४ गडी बाद

**<><><><><>**

राज्यात येत्या २० तारखेला होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत एकूण ९ कोटी ७० लाख २५ हजार ११९ मतदारांना मतदानाचा हक्क बजावता येईल. यामध्ये १८ ते १९ वयोगटातले एकूण २२ लाख २२ हजार ७०४, तर वयाची शंभर वर्षे पूर्ण झालेले ४७ हजार ३९२ मतदार आहेत. मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं ही माहिती दिली.

राज्यातल्या एकूण मतदारांमध्ये ५ कोटी २२ हजार ७३९ पुरुष, ४ कोटी ६९ लाख ९६ हजार २७९ महिला, तर ६ हजार १०१ तृतीयपंथी मतदार आहेत.

राज्यात मतदानासाठी एकूण १ लाख १८६ मतदान केंद्रं उभारली जाणार आहेत. यापैकी शहरी भागात ४२ हजार ६०४, तर ग्रामीण भागात ५७ हजार ५८२ केंद्रं असतील.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीच्या तयारीच्या कामांना राज्यात वेग आला आहे.

**पालघर** जिल्ह्यातल्या डहाणू या अनुसूचित जमातींसाठी राखीव मतदारसंघासाठी निवडणूक निरीक्षक म्हणून अजय कटेसरिया यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

**यवतमाळ** जिल्ह्यात सर्व सातही विधानसभा मतदारसंघात विधानसभा निवडणूक नि:पक्षपाती, निर्भय आणि शांततेच्या वातावरणात पार पाडण्यासाठी राजकीय पक्षांनी आयोगाला सहकार्य करावं, असं आवाहन निवडणूक निरीक्षकांनी राजकीय पक्षांना केलं आहे.

**<><><><><>**

राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी आचारसंहिता लागू झाल्यापासून आजपर्यंत सी-व्हिजिल ॲपवर आलेल्या २ हजार ६२ तक्रारींपैकी २ हजार ५९ तक्रारी निवडणूक आयोगानं निकाली काढल्या आहेत. मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं ही माहिती दिली.

दरम्यान राज्य आणि केंद्र सरकारच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांनी केलेल्या कारवाईत बेकायदा पैसे, दारू, अंमली पदार्थ, आणि मौल्यवान धातू इत्यादी २३४ कोटी ४९लाख रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे.

**<><><><><>**

मुंबादेवी विधानसभा मतदार संघातल्या शिवसेनेच्या उमेदवार शायना एन.सी यांच्याबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केल्याचा गुन्हा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार अरविंद सावंत यांच्या विरोधात आज दाखल करण्यात आला. नागपाडा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ७९ आणि कलम

३५६/२ नुसार शिवसेनेनं तक्रार नोंदवल्यानंतर सावंत यांच्या विरोधात हा गुन्हा दाखल केला.

महिलांचा मान सन्मान करणं ही आपली संस्कृती आहे, मात्र अरविंद सावंत यांनी अश्लाघ्य शब्दांत महिलांचा अपमान केला. ही त्यांची संस्कृती आहे का, असा सवाल शायना एन.सी यांनी केला आहे. कोणत्याही महिलेविरोधात अपशब्द वापराल तर महिला शांत बसणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

**<><><><><>**

शिवसेनेचे मुंबईतले माहीमचे उमेदवार सदा सरवणकर यांनी, आपण निवडणूक लढवण्यावर ठाम असून कदापि माघार घेणार नसल्याचं आज पुन्हा स्पष्ट केलं. यासंदर्भात वर्षा या शासकीय निवासस्थानी जाऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेण्याचा आपण प्रयत्न केला, मात्र त्यांची भेट होऊ शकली नाही, असं सरवणकर यांनी आज बातमीदारांशी बोलताना सांगितलं.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे यांनी माहीम मतदारसंघातून उमेदवारी अर्ज भरला असून, भाजपानं त्यांना पाठिंबा देण्याची तयारी दाखवली आहे.

**<><><><><>**

दीपावलीच्या प्रकाश पर्वानिमित्त सर्वत्र उत्साहाचं वातावरण आहे. घरोघरी आकाश कंदील, पणत्या, विजेच्या दिव्यांची आकर्षक रोषणाई, रांगोळ्या, या बरोबरीनं आप्तजनांच्या भेटीगाठी, फराळाच्या पदार्थांची मेजवानी असं चैतन्याचं वातावरण आहे. सर्वत्र लक्ष्मी पूजन होत असून त्यासाठी झेंडूच्या फुलांनी आणि तोरणांनी बाजरपेठा सजल्या आहेत. दिवाळी निमित्त अनेक सामाजिक सांस्कृतिक उपक्रमांचं आयोजनही ठिकठिकाणी केलं जात आहे. पुणे मुंबईसह सर्वच शहरात

दिवाळी पहाट कार्यक्रमांची रेलचेल आहे. अनेक सामाजिक संस्थांमार्फत अन्नदान, वस्त्रदान असे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. अनेक ठिकाणी रंगावली प्रदर्शनंही भरली आहेत.

<><><><><>

शिर्डीमधे साईबाबा संस्थानच्या वतीनं सालाबादप्रमाणे याही वर्षी दिवाळीनिमित्त साईबाबांच्या समाधी मंदिरात लक्ष्मी कुबेर पूजन, संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर आणि त्यांच्या पत्नी वंदना गाडीलकर यांच्या हस्ते करण्यात आलं. यावेळी साईबाबांच्या मूर्तिवर विविध हिरेजडीत सुवर्ण अलंकार चढवले होते.

पंढरपूरच्या विठ्ठल रुक्मिणी मंदिरातही मंदिर समितीनं विविध फुलांच्या माध्यमातून आकर्षक आरास केली होती.

<><><><><>

रेल्वे तिकीट आरक्षणाचे नवीन नियम आजपासून लागू झाले आहेत. रेल्वेनं याआधी असलेल्या १२० दिवसांच्या आरक्षण कालावधीत कपात करून तो ६० दिवसांवर आणला आहे. मात्र, ३१ ऑक्टोबरपर्यंत झालेली आरक्षणं कायम राहतील अशी माहिती रेल्वेनं दिली आहे. ६० दिवसांच्या आरक्षण कालावधीमुळे तिकिटांच्या उपलब्धतेच्या शक्यता वाढून त्याचा प्रवाशांना थेट लाभ मिळेल असं रेल्वे प्रशासनानं म्हटलं आहे. ६१ दिवस ते १२० दिवसांच्या कालावधीसाठी केलेलं तिकीट आरक्षण प्रवाशांकडून रद्द करायचं प्रमाण २१ टक्के एवढं होतं अशी माहिती रेल्वेनं दिली आहे.

<><><><><>

दिवाळी आणि छटपूजा सणांच्या पार्श्वभूमीवर रेल्वे प्रवाशांच्या संख्येत होणारी वाढ लक्षात घेऊन मध्य रेल्वे २ आणि ३ नोव्हेंबर २०२४ रोजी अतिरिक्त विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. याअंतर्गत दोन्ही दिवस मुंबईतल्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, दादर, लोकमान्य टिळक टर्मिनस आणि पनवेल या स्थानकांवरून गोरखपूर, दानापूर, छपरा, काझीपेठ या ठिकाणांसाठी प्रत्येकी ५ गाड्या सोडल्या जाणार आहे.

महत्वाचा सण साजरा करताना रेल्वे प्रवाशांना विनाअडथळा प्रवास करता यावा यासाठी विशेष गाड्या सोडत असल्याचं रेल्वेनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज **नांदेड** जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

राष्ट्रीय शेअर बाजार आणि मुंबई शेअर बाजारात आज लक्ष्मीपूजना निमित्त सुट्टी आहे. मात्र व्यापाऱ्यांचं नव वर्ष विक्रम संवत २०८१ च्या प्रारंभानिमित्त आज संध्याकाळी ६ ते ७ दरम्यान मुहूर्ताचे सौदे झाले. त्यात सेन्सेक्स ३३५ अंकांनी वधारून ७९ हजार ७२४ अंकांवर बंद झाला. निफ्टी ९४ अंकांनी वधारून २४ हजार ३०० अंकांवर बंद झाला.

**<><><><><>**

व्यावसायिक वापराच्या एलपीजी सिलेंडरच्या दरात ६२ रुपये वाढ झाली आहे. तेल कंपन्यांनी जाहीर केलेल्या सुधारित दरपत्रकानुसार १९ किलो वजनाचा सिलेंडर आता १ हजार ७४० रुपयांऐवजी १ हजार ८०२ रुपयांना मिळेल. ५ किलो वजनाच्या सिलेंडरसाठी आता १५ रुपये जास्त मोजावे लागतील मात्र १४ किलो २०० ग्रॅमच्या सिलेंडरच्या दरात बदल झालेला नाही.

**<><><><><>**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात कसोटी क्रिकेट मालिकेतल्या मुंबईच्या वानखेडे मैदानावर सुरु असलेल्या तिसऱ्या आणि अखेरच्या सामन्यात आज पहिल्याच दिवशी एकूण १४ गडी बाद झाले. आजच्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा भारताच्या पहिल्या डावात ४ बाद ८६ धावा झाल्या होत्या. पहिल्या डावात भारत अजूनही १४९ धावांनी पिछाडीवर आहे.

या सामन्यात न्यूझीलंडनं नाणेफेक जिंकून पहिली फलंदाजी करायचा निर्णय घेतला. मात्र ठराविक अंतरानं त्यांचे फंलंदाज बाद होत गेले, आणि त्यांचा पहिला डाव २३५ धावांत आटोपला. भारताच्या वतीनं रविंद्र जडेजानं न्यूझीलंडचे ५ तर वॉशिंग्टन सुंदर यानं ४ गडी बाद केले. न्यूझीलंडच्या डॅरील मिचेल यानं सर्वाधिक ८२ धावा केल्या.

त्यानंतर पहिल्या डावात फलंदाजीसाठी आलेल्या भारताची सुरुवातही खराब झाली कर्णधार रोहित शर्मा आणि विराट कोहली यांना पुन्हा एकदा अपयश आलं. नाईट वॉचमन म्हणून आलेला मोहम्मद सिराज शून्यावर, तर यशस्वी जयस्वाल ३० धावा करून परतला.

सध्या शुभमन गील ३१ तर ऋषभ पंत एका धाव करून खेळपट्टीवर आहे. या मालिकेतले पहिले दोन्ही सामने जिंकून न्यूझीलंडनं २-० अशी आघाडी घेतली आहे.

**<><><><><>**

सोलापूर जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेल्या पावसामुळे अनेक ठिकाणचं कांदा पिक वाया गेलं आहे. हा भिजलेला कांदा कवडीमोलानं विकण्याची पाळी शेतकऱ्यांवर आली असून काही वेळा तर शेतकऱ्यांना काहीही मिळत नसल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**<><><><><>**

दिवाळीच्या निमित्तानं मुंबई विद्यापीठाच्या वसतिगृहात राहणाऱ्या  ईशान्य भारतासह देशातल्या विविध भागातल्या विद्यार्थ्यांसोबत आज  कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनी संवाद साधला. मुंबई विद्यापीठाच्या मुलींच्या विविध वसतीगृहात आज विद्यार्थ्यांनी उत्साहात दिवाळी साजरी केली. यावेळी कुलगुरुंनी विद्यार्थ्यांना दिवाळी फराळाचं वाटप केलं.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**